**ठळक बातम्या**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा दलांची शोधमोहीम जारी/ लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी काश्मीरात दाखल

- पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवून त्यांना तात्काळ परत पाठवण्यासाठी पावलं उचलण्याच्या केंद्रीय गृहमंत्र्यांच्या सर्व राज्यांना सूचना

- स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल कुठलंही अवमानकारक वक्तव्य न करण्याची सर्वोच्च न्यायालयाची राहुल गांधी यांना ताकीद

**आणि**

- ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि इस्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांचं निधन

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याशी संबंध असलेल्या लष्कर - ए - तैय्यबाच्या तीन दहशतवाद्यांची माहिती देणाऱ्यांना एकूण ६० लाख रुपयांचं बक्षीस पोलिसांनी जाहीर केलं आहे. या दहशतवाद्यांवर प्रत्येकी वीस लाखांचं इनाम पोलिसांनी ठेवलं आहे. पोलिसांनी तिन्ही संशयित हल्लेखोरांची रेखाचित्रं जारी केली आहेत.

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आज सकाळी श्रीनगरला पोहचले. पहलगाम जवळ बैसरन इथं प्रत्यक्ष हल्ल्याच्या ठिकाणी ते भेट देण्याची शक्यता आहे. सुरक्षा दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर त्यांची  बैठक होईल. हल्लेखोर दहशतवाद्यांना पकडण्याच्या कामाचा आणि सुरक्षा स्थितीचा आढावा ते घेतील. पहलगाम हल्ल्यानंतर नौगाव, कुपवाडा तसंच जम्मूतल्या राजौरी आणि पूंछ भागात पाकिस्तान प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपार शस्त्रसंधीचं उल्लंघन करत असल्याचं वृत्त आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याबद्दल निषेधाचे पडसाद देशभरात अजूनही ठळकपणे उमटत आहेत. अनेक ठिकाणी नागरिकांनी उत्फूर्तपणे दहशतवादाचा निषेध करत

मोर्चे काढले तर अनेक ठिकाणी उत्स्फूर्तपणे बंद पाळण्यात आला. दिल्लीत आज व्यापाऱ्यांनी बंद पाळला आहे.

दरम्यान पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानविरोधात केंद्रसरकारनं जाहीर केलेल्या उपाययोजनांतर्गत, विसा रद्द करण्याची तरतूद पाकिस्तानच्या हिंदू धर्मीय नागरिकांना लागू होणार नाही, असं केंद्रसरकारनं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये सुरक्षा दलांकडून व्यापक शोध मोहीमा राबवल्या जात आहेत. उत्तर काश्मीरच्या बांदीपोरा जिल्ह्यात बाज़ीपोरा कुलनार वनक्षेत्रात लष्कर ए तैयबाचा सदस्य असलेल्या एका दहशतवाद्याला सुरक्षा दलांनी कंठस्नान घातलं.

काही दहशतवादी लपून बसल्याची खबर मिळाल्यानं पोलीस आणि लष्कराच्या संयुक्त पथकानं या भागातली घेराबंदी अधिक कठोर केली. आज सकाळी दोन्ही बाजूंकडून जोरदार गोळीबार झाला. दरम्यान, पंजाबच्या फिरोजपूर क्षेत्रात तैनात असलेला सीमा सुरक्षा दलाचा एक जवान चुकून पाकिस्तानच्या हद्दीत गेल्यानं पाकिस्तानी सैन्यानं त्याला ताब्यात घेतलं आहे.

<><><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत - पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय विमान कंपन्यांना पाकिस्तानच्या हवाई क्षेत्राचा वापर करण्यास बंदी घालणार असल्याचं पाकिस्ताननं म्हटलं आहे. त्यामुळे भारतातील नोंदणीकृत विमानं तसंच भारतीय कंपन्यांच्या मालकीची किंवा भाडेतत्त्वावर घेतलेली विमानं पाकिस्तानच्या  हवाई क्षेत्राचा वापर करू शकणार नाहीत. उत्तर अमेरिका, ब्रिटन, युरोप आणि मध्य पूर्वेकडची एअर इंडियाची काही उड्डाणं पर्यायी विस्तारित मार्गानं जातील, असं एअर इंडियानं म्हटलं आहे.

<><><><><>

पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवून त्यांना तात्काळ परत पाठवण्यासाठी पावलं उचलण्याच्या सूचना केंद्र सरकारनं सर्व राज्यांना केल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन हा संदेश दिला. सिंधू जल कराराच्या संदर्भात अमित शहा संध्याकाळी बैठक घेणार आहेत. त्यात केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

<><><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर गेल्या २ दिवसात महाराष्ट्रातले सुमारे ८०० पर्यटक राज्यात सुखरूप परतले आहेत. राज्य सरकारनं या पर्यटकांसाठी दोन विशेष विमानांची व्यवस्था केली होती, त्यातून १८४ पर्यटक काल मुंबईत दाखल झाले. आणखी २३२ प्रवाशांसाठी आज एका विशेष विमानाची व्यवस्था राज्य सरकारनं केली आहे. काश्मिरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्राच्या पर्यटकांना परत आणण्यासाठी मंत्रालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि महाराष्ट्र सदनातला कक्ष अशी त्रिस्तरीय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

राज्यात परतलेल्याल्या पर्यटकांना मुंबईहून त्यांच्या मूळ गावी वातानुकूलित शिवनेरी बसने  पाठवण्याची सोय एसटी महामंडळाकडून करण्यात आली. मुंबई विमानतळावर या पर्यटकांसाठी ८ शिवनेरी बसेस सज्ज ठेवण्यात आल्या होत्या.

<><><><><>

पहलगाम दहशदवादी हल्ल्यातल्या मृतांच्या कुटुंबियांना राष्ट्रीय शेअर बाजारानं १ कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. या कुटुंबियांना शक्य ती सर्व मदत करायची तयारी असल्याचं NSE चे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिषकुमार चौहान म्हणाले.

<><><><><>

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याबद्दल कुठलेही अवमानकारक वक्तव्य करु नका अशी ताकीद सर्वोच्च न्यायालयानं विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना दिली आहे. नोव्हेंबर २०२२ मध्ये भारत जोडो यात्रेदरम्यान अकोल्यात झालेल्या सभेत त्यांनी सावरकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. त्यासंदर्भात न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि मनमोहन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. यापुढे स्वातंत्र्य सैनिकांबद्दल अशाप्रकारची वक्तव्य केली तर न्यायालय स्वतःहून कारवाई करेल, अशा इशाराही खंडपीठानं दिला. यापुढे अशी वक्तव्य करणार नाही, असं आश्वासन राहुल गांधी यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी न्यायालयाला दिलं. त्यानंतर न्यायालयानं गांधी यांना बजावलेल्या समन्सला स्थगिती दिली.

**<><><><><>**

सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना मानहानी प्रकरणी दिल्ली पोलिसांनी आज दिल्लीच्या निजामुद्दीन भागातून अटक केली. न्यायालयानं दिलेल्या आदेशांचं पालन न केल्यामुळे दिल्लीतल्या एका न्यायालयानं दोन दिवसांपूर्वी त्यांच्या नावे अजामीनपात्र अटक वॉरंट जारी केलं होतं. त्यानंतर आज त्यांना अटक झाली आणि दिल्लीतल्या साकेत न्यायालयासमोर हजर करण्यात आलं. पाटकर यांनी हमीपत्र दाखल करून नुकसानभरपाईची रक्कम जमा केल्यावर त्यांची सुटका करावी, असे आदेश साकेत न्यायालयानं दिले.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं सादर केल्याप्रकरणी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याला मुंबई उच्च न्यायालयाने अटकेपासून दिलासा दिला आहे. आपल्याविरुद्ध दाखल केलेला गुन्हा रद्द करण्यासाठी कामरा याने याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी

घेताना मुंबई उच्च न्यायालयाने कामराविरुद्ध तपास सुरू ठेवावा मात्र याचिका प्रलंबित असेपर्यंत त्याच्यावर अटकेची कारवाई करू नये, असे आदेश मुंबई पोलिसांना दिले आहेत. तसंच, चेन्नई इथे जाऊन त्याचा जबाब नोंदवावा असे आदेशही न्यायालयाने पोलिसांना दिले आहेत.

**<><><><><>**

इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉक्टर कृष्णस्वामी कस्तुरीरंगन यांचं आज बेंगळुरू इथे त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. ते १९९४पासून २००३ पर्यंत इस्रोचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. कस्तुरीरंगन यांनी पीएसएलव्हीच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली.तसंच, त्यांच्या कार्यकाळात चांद्रयानासारख्या मोठ्या मोहिमांचं नियोजन करण्याची सुरुवात झाली होती. निवृत्तीनंतर त्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे कुलपती आणि कर्नाटक ज्ञान आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिलं. उच्च शिक्षण, तंत्रज्ञान आणि पर्यावरणासारख्या विविध विषयांवर सल्लागार म्हणून त्यांनी काम केलं होतं. त्यांच्या योगदानासाठी त्यांना पद्म श्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या नागरी सन्मानांनी गौरवण्यात आलं होतं. डॉ. कस्तुरीरंगन यांनी मुंबई विद्यापीठातून भौतिकशास्त्रात पदवी आणि पदव्युत्तर पदवी घेतली होती. १९७१ मध्ये अहमदाबाद येथील भौतिक संशोधन प्रयोगशाळेत काम करताना प्रायोगिक उच्च ऊर्जा खगोलशास्त्र या विषयात त्यांनी डॉक्टरेट मिळवली होती. डॉ. कस्तुरीरंगन यांनी इस्रोचे प्रमुख म्हणून भारताच्या अंतराळ कार्यक्रमाच्या उत्क्रांतीत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार करण्यासाठी जे काम केलं, त्यामुळे पुढच्या पिढीच्या जडणघडणीसाठी उपयुक्त ठरत असल्याची भावना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही कस्तुरीरंगन यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

गेल्यावर्षीच्या नीट UG परीक्षा पेपरफुटी प्रकरणातला प्रमुख आरोपी संजीव मुखिया याला बिहार पोलिसांनी दानापूरमधून काल रात्री अटक केली.  त्याच्यावर बिहार पोलिसांनी ३ लाखांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

<><><><><>

आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद संघादरम्यान होणार आहे. चेन्नई इथं संध्याकाळी साडेसात वाजता सामना सुरु होईल.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २७ एप्रिल रोजी आकाशवाणी वर 'मन-की-बात' कार्यक्रमाच्या माध्यमातून देश-विदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सादर होणाऱ्या या कार्यक्रमाचा हा १२१ वा भाग असेल. नागरिकांनी त्यांचे विचार आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकाद्वारे पाठवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, तसंच प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वरून मन-की-बात या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण होणार असून त्यानंतर लगेचच विविध प्रादेशिक भाषांमधून या कार्यक्रमाचा अनुवाद प्रसारित करण्यात येईल.

//<><><><><>//